पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक ६
सभावृत्तांत

दि.१०/९/२०१४ वेळ. दु.१२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची दि.१०/९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील सभागृहात सभा आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.वनिता एकनाथ थोरात सभापती
२. मा.सोनवणे पौर्णीमा रविंद्र (आप्पा)
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.स्वाती प्रमोद साने
६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
७. मा.पवार संगीता शाम
८. मा.बो-हाडे शुभांगी संजय
९. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.सतीश इंगळे कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता विदयुत, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.विश्वास नगरे कार्यालयीन अधिक्षक, श्री.राणे आर.व्ही. उपअभियंता स्थापत्य, श्री.व्ही.जी.कांबळे उपअभियंता स्थापत्य, श्री. शितोळे एस.के. कनिष्ठ अभियंता, श्री.सी.सी.मोरे, श्री.डी.डी.गायकवाड हार्टीकल्चर सुपरवायझर इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी, असे सांगितले. मागील सभेचा म्हणजेच दि.२३/७/२०१४ व दि.१३/८/२०१४ च्या सभेचा सभावृत्तांत कार्यपत्रिका क्रमांक ४ व ५ च्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

क्षेत्रीय अधिकारी मा.दिलीप गावडे व कार्यकारी अभियंता (स्थापत्य विभाग) मा.एस.एन.इंगळे यांचे स्वागत मा.सभापती व इतर सन्मा.सदस्य यांचे हस्ते करण्यात आले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ मा.अरुणा भालेकर व मा.शुभांगी बो-हाडे
कोयनानगर सेक्टर नं.१९ मधील मार्गास "विघ्नहर्ता गणेश मार्ग" असे नामकरण करणेबाबत

विषय क्र.२ मा.अरुणा भालेकर व मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव
प्र.क्र.४ कृष्णानगर येथील स्पाईन रोड ते शिवाजी पार्क रस्त्याचे डांबरीकरणा ऐवजी महात्मा फुले नगर येथील हॉटेल शिवशंकर ते तिरुपती हौ.सोसायटी व माऊली हौ.सोसायटी समोरील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत

विषय क्र.३ मा.शांताराम भालेकर व मा.पौर्णीमा सोनवणे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.१ रुपीनगर तळवडे येथे प्रा.आरोग्य केंद्र सुरु होत आहे. त्यास "स्व.शंकरराव बारकुजी देशमुख प्रा.आरोग्य केंद्र रुपीनगर" असे नामकरण करणेबाबत

विषय क्र.४ मा.शांताराम भालेकर व मा.पौर्णीमा सोनवणे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.१ मधील प्रबोधनकार ठाकरे शाळेतील खेळाचे मैदानास "कै.नामदेव हरी भालेकर" असे नामकरण करणेबाबत

सन्मा.सदस्य/सदस्या यांची खालीलप्रमाणे चर्चा झाली.

**मा.नारायण बहिरवाडे:-**

१.सभागृह मोठे असावे, जेणे करुन सन्मा.सदस्य व अधिकारी हे समोरासमोर बसण्याची आसन व्यवस्था असावी. कर्मचारी वर्ग अपुरे आहे. ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होतात. आरोग्याचे कर्मचारी वेळेवर येत नाही. त्यामुळे घाणीचे साम्राज्य वाढते. रोजचे रोज कचरा उचलला जात नाही. अस्वच्छतेमुळे रोगराईचे प्रमाण वाढलेले आहे. विदयुत पोलवर दिवे लागत नाही. फोन करुनही कोणीही साईटवर येत नाही. बोर्ड, फेल्स् आचारसंहितेमुळे बोर्ड काढताना फाटले जातात. ते योग्य पध्दतीने झाकले जाईल. नुकसान होऊ देवू नये.

**मा.भालेकर शांताराम:-**

ड्रेनेज वारंवार चोकअप होतात. स्वच्छता होत नाही. आजार वाढत आहे. कचरा उचलणा-या गाडया येत नाही. दिवे लागत नाही.

**मा.शुभांगी बो-हाडे:-**

वॉर्डातील दिवे लागत नाही. परंतु चौकातील दिवे लागले पाहिजे. मधुकर पवळे ब्रीज खाली दिवे लागत नाही. ही बाब योग्य नाही. कृपया चौकातील दिवे लागले पाहिजे. याची दक्षता घेणे. पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही.

**मा.संगीता पवार:-**

से.क्र.२२ वॉर्ड हा झोनिपु विभागात असल्यामुळे विदयुतची कामे होत नाही. केबल लोंबकळत असतात.विदयुत मीटर लावत नाही. माझ्या वॉर्डातील कोणतीच कामे होत नाही. प्रभागात स्वच्छता रोजचे रोज होत नाही. रोगराईचे प्रमाण वाढत आहे. लहान मुलांना प्रतिकार करण्याची शक्ती कमी असते. त्यामुळे कच-याच्या गाडया रोजच्या रोज प्रभागात आल्या पाहिजेत.

**मा.स्वाती साने:-**

चिखलीतील आरक्षण क्र.१/९९ गट नं.१६४४ येथील नियोजीत शाळेच्या निविदा प्रक्रीयेचे काम पुर्ण झालेले आहे. भुमीपूजन झालेले आहे. काम वेगात सुरु करावे. अंतर्गत रस्ते, डांबरीकरण झालेले नाही. पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही.

**मा.पौर्णीमा सोनवणे:-**

अधिकारी व्यवस्थित संभाषण करीत नाही. डेंग्युचे रुग्ण वाढत आहे. प्रभागात स्वच्छता होत नाही. कच-यांचे प्रमाण वाढत आहे. सर्व सोसायटीमध्ये औष्णीक धुरीकरण, औषध फवारणी होत नाही.

| | |
|---|---|
| ठराव क्र.३४ | विषय क्र.१ |
| दि.१०/९/२०१४ | विभाग:-भुमीजिंदगी |
| सुचक:-मा.वनिता थोरात | अनुमोदक:- मा.स्वाती साने |

संदर्भ:- मा.वनिता थोरात व मा.स्वाती साने यांचा दि. १०/९/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- हॉकर्स झोन जागा निश्चीतीकरणाबाबत चर्चा करणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात हॉकर्स धारकासाठी स्थळे व क्षमता निश्चित करणे, नकाशे करणे आदीबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणेकामी सदरचा विषय बुधवार दि. ८/१०/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत यावा. प्रभाग समितीचे मान्यतेशिवाय विषय पुढे पाठवू नये असेही ठरविणेत आले.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

मा.सभापती यांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय

ठराव क्र.३५ विषय क्र.२

दि.१०/९/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:-मा. अरुणा भालेकर अनुमोदक:- मा. शुभांगी बो-हाडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि. १०/९/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- कोयनानगर सेक्टर नं.१९ मधील स्थानिक नागरीक व कोयनानगर विकास कृति समितीच्या विनंती अर्ज व नामकरण मागणीनुसार कोयनानगर सेक्टर नं.१९ मधील मार्गास "विघ्नहर्ता गणेश मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्र.३६ विषय क्र.३

दि.१०/९/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:-मा. अरुणा भालेकर अनुमोदक:- मा. शुभांगी बो-हाडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर व मा. शुभांगी बो-हाडे यांचा दि. १०/९/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- प्र.क्र.४ कृष्णानगर येथील स्पाईन रोड ते शिवाजी पार्क रस्त्याचे डांबरीकरण ऐवजी महात्मा फुलेनगर येथील हॉटेल शिवशंकर ते तिरुपती हौ.सोसायटी व माऊली हौ.सोसायटी समोरील रस्त्यांचे डांबरीकरण करणेबाबत.

सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथील स्पाईन रोड ते शिवाजी पार्क समोरील रस्त्याचे डांबरीकरणाचे निविदा काढण्यात आलेली आहे. सदर काम करणेऐवजी प्र.क्र.४ मधील शिवशंकर हॉटेल ते तिरुपती हौ.सोसायटी हा रस्ता व महात्मा फुले नगर मधील माऊली हौ. सोसायटी समोरील रस्त्यांचे डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र.३७ विषय क्र.४

दि.१०/९/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:-मा. शांताराम भालेकर अनुमोदक:- मा. पौर्णीमा सोनवणे

संदर्भ:- मा.शांताराम भालेकर व मा. पौर्णीमा सोनवणे यांचा दि. १०/९/२०१४ चा प्रस्ताव

विषय:-नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.१ रुपीनगर तळवडे येथे प्रा.आरोग्य केंद्र सुरु होत आहे. त्या प्रा.आरोग्य केंद्रास "स्व.शंकरराव बारकुजी देशमुख प्रा.आरोग्य केंद्र रुपीनगर" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.३८ विषय क्र.५

दि.१०/९/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:- मा.शांताराम भालेकर अनुमोदक:- मा.पौर्णीमा सोनवणे

संदर्भ:- मा.शांताराम भालेकर व मा.पौर्णीमा सोनवणे यांचा दि.१०/९/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.१ मधील प्रबोधनकार ठाकरे शाळेतील खेळाचे मैदानास "कै.नामदेव हरी भालेकर" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

मा.सभापती यांनी सदरची सभा संपुष्टात आणून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
वनिता एकनाथ थोरात
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/११४/२०१४
दिनांक:- १०/९/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना